## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची साक्ष

## निशाणी क्र. १७

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | प्रमिला देविदास बोरसे, |
| वय | – | ५४ वर्षे, |
| व्यवसाय | – | सुखवस्तु, |
| सध्या नेमणुक | – | प्लॉट नं. २८, हुडको कॉलनी, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. घटना दि. ०५.०२.२०२० रोजीची आहे. त्यादिवशी मी माझ्या घरी होती. त्यादिवशी मला आजीला घरात कोंडुन चालले गेल्याबाबत फोन आला होता. फोन आल्यानंतर आम्ही इकडे आलो असता आजीला कोंडलेले होते. त्यानंतर पोलीस वगैरे आले व त्यांनी कुलुप तोडले. आम्ही तेथेच होतो. त्यानंतर आजीला बाहेर काढले व चहा वगैरे पाजले. त्यानंतर तिला सिव्हील हॉस्पिटलमध्ये नेले. त्याठिकाणी आजीने मुलाविषयी व सुनेविषयी त्यांनी तीन दिवसांपासुन कोंडले असल्याबाबत पोलीसांकडे तक्रार केली. सदर घटनेबाबत माझा जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. पी. कुवर यांचे मार्फत.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मागील अनेक वर्षापासुन म्हणजेच सन २०१५ पासुन माझे नारायण चौधरी यांच्याकडे जाणे येणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, कौटुंबिक वादामुळे आम्ही आजीच्या दशक्रियेकरीता देखील गेलो नाही. ज्या माणसाने मला फोन केला त्याचे नाव शेख असे होते. हे म्हणणे खरे आहे की, माझा नंबर शेख याचेकडे नाही व शेख याचा नंबर माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, गेल्या अनेक वर्षापासुन आईचे ऑपरेशन संगोपन हे नारायण चौधरी करीत आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आजपावेतो आजीच्या

कारणावरुन मी नारायण चौधरी अथवा त्यांची पत्नी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजीला मराठी लिहिता, वाचता व बोलता येत नव्हते. तसेच तिला मराठी समजत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आजीने पोलीसांना मराठीत काही सांगितले असे घडले नाही. मी व माझ्या पतीने सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी मजकुर लिहुन घेतला असे झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा एकच जबाब नोंदविला होता व तो ०५ तारखेचा होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर ०५ तारखेचा जबाब अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नसल्यामुळे सदर जबाब अभिलेखावर नाही.

०३.	हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा येथे चोऱ्यांचे प्रमाण भरपुर असल्याने येथे घरातील दरवाजाच्या बाहेर लोखंडी दरवाजा बसविलेला असतो. पोलीसांनी बाहेरुन लोखंडी दरवाजाचे कुलुप तोडुन त्याचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी केवळ एकच कुलुप तोडले. हे म्हणणे खरे नाही की, माझे व नारायण चौधरी यांचे वाद असल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या मागील अथवा समोरील दरवाजास कुलुप नव्हते व दरवाजे केवळ लोटलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६.०२.२०२० रोजी आजी हया नारायण चौधरी यांच्यासोबत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०२.२०२० पासुन ते आजीचा मृत्यु होईपावेतो त्यांचे पालनपोषण नारायण चौधरी यांनी केले. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमुद केल्याप्रमाणे फिर्यादीला कोंडल्याची कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नारायण चौधरी व त्यांच्या पत्नीविषयी राग असल्याने मी आज रोजी त्यांच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.12.09 12:55:22 +0530

दिनांक : ०८/१२/२०२५		(आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा		न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – जी. एस. अहिरे,

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. – ०९.१२.२०२५.

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)